मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत

# सहायक पोलीस आयुक्त,मिरारोड विभाग.

पत्ता:-मिरारोड पो.ठाणे,दुसरा मजला,बेव्हर्ली पार्क,कनाकिया,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे.महाराष्ट्र ४०११०७.
Email Add:- acp.mirard.mb-vv@mahapolice.gov.in

क्र.सपोआ/जाहिरनामा प्रसिध्दी/अ.मृ./५९५८ /२०२५ दि.२७.१०.२०२५.

मिरा - भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
दाखल ता. 07/11/25
आयुक्त
मि. भा. म. न. पा

वाचले :-

१. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) च्या कलम २१ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १५ मधील तरतूदीनुसार.
२. महाराष्ट्र शासन,गृह विभाग,यांचेकडील अधिसुचना-क्र.पीआरओ-०१२०/प्र.क्र.२१७/विशा-२,दि.१९ ऑक्टो.२०२०,
३. महाराष्ट्र शासन,गृहविभाग यांचेकडील सर्वसाधारण क्र.१६१/२०२४ दि.१० सप्टेंबर २०२४.
४. मा.अपर पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय,यांचेकडील क्र.अपोआ/पो.आ.अधि.प्र./१४२/२०२०,दि.१२ नोव्हें.२०२०,
५. मा.पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय,यांचेकडील क्र.पोआ-मिभाववि/अक.मृत्यु.क्रिप्रोको.१७४/१७८/२३ दि.२६.०७.२०२३.

## -: जाहिरनामा क्र.२०/२०२५ :-

सदर जाहीर नोटीसद्वारे जनतेस आवाहन करण्यात येते की, मिरारोड उपविभागाअंतर्गत काशिमीरा, काशिगांव व मिरारोड पो.ठाणे आहेत. संबधीत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचेकडून फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७४ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार दाखल अकस्मात मृत्युमधील मयत व्यक्तींच्या मृत्यूच्या दर्शनी कारणांचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

पोलीस ठाण्याकडून फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७४ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार प्राप्त झालेल्या अकस्मात मृत्युमधील मयत व्यक्तींचे मृत्युचे कारण दर्शविणारे व चौकशी करणेबाबतचे अधिकार फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७६(२) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९६ नुसार या कार्यालयास प्राप्त झाले आहेत व त्याबाबत चौकशी सुरू आहे.

दि.१२.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ दरम्यान इकडील कार्यालयात प्राप्त प्रकरणानुसार मयत इसमांची यादी मृतकांच्या मृत्यूचे कारण व नातेवाईक/खबर देणाऱ्यांच्या नांवासह खालील तक्त्यात नमूद केलेली आहेत.

| क्र. | आ.क्र. | पो.ठाणे | अ.मृ.क्र. | मृतकाचे नांव | वय /वर्षे | मृत्यूचे कारण | नातेवाईक/खबर देणार नांव | मृत्युचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २०२५<br>१४.१०.२५ | मिरारोड | ३७/२०२५ | रियाज जाफर सोलकर | ६१ | हृदयविकार | साजीदा रियाज सोलकर | नैसर्गिक |
| २. | २०३८<br>१५.१०.२५ | मिरारोड | ३६/२०२५ | नागेंद्रकुमार रामचंद्र महतो | ४८ | मेंदूत रक्तस्त्राव होऊन | नबता नागेंद्र महतो | नैसर्गिक |
| ३. | २०५८<br>२१.१०.२५ | काशिमीरा | ५९/२०२५ | श्यामधर शिवराम यादव | ३७ | हृदयविकार | मुरलीधर हृदय यादव | नैसर्गिक |
| ४. | २०५१<br>२१.१०.२५ | काशिमीरा | १२/२०२५ | विल्यम लिओ सलडाना | ३१ | हृदयविकार | एर्वील लिओ सलडाना | नैसर्गिक |
| ५. | २०७५<br>२५.१०.२५ | काशिगांव | ६६/२०२५ | संजय लालबहादूर भुईया | २५ | हृदयविकार | राकेश श्रीकृष्णा चौव्हाण | नैसर्गिक |

फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७६(२)(४) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून उक्त नमूद मयत इसमांच्या मृत्यूच्या कारणाबाबत मयत व्यक्तींचे मृत्यूचे कारण दर्शविणारे आदेश व चौकशी करणे प्रस्तावित आहे.

कृपया मागे पहावे.२/-

मागील पानावरुन-

तरी संबंधीत मयत इसमांच्या मृत्यूबाबत त्यांचे नातेवाईक,हितसंबंधीत अथवा अन्य कोणासही संशय/तक्रार/हरकत असल्यास याबाबतचे म्हणणे किंवा त्याबाबतचे पुरावे/साक्ष देणेची असल्यास संबंधीतांनी हा जाहीर -नामा प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे आत सहायक पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,मिरारोड विभाग. पत्ता :- मिरारोड पो.ठाणे इमारत,दुसरा मजला,मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे.पीन-४०११०७ येथे कार्यालयीन वेळेत हजर राहून आपले म्हणणे तोंडी अथवा लेखी स्वरुपात सादर करावे असे आवाहन जाहीर नोटीसव्दारे जनतेस करण्यात येत आहे.

विहीत मुदतीत कोणाच्याही हरकती/तक्रार प्राप्त न झाल्यास या संदर्भात कोणाचीही हरकत नसल्याचे गृहीत धरुन अकस्मात मृत्यू समरी मंजूरीचे आदेश निर्गमीत करण्यात येतील.

(गणपत पिंगळे )
सहायक पोलीस आयुक्त,
मिरारोड विभाग.

प्रति,

१. प्रभारी अधिकारी,
काशिमीरा, मिरारोड, काशिगांव पो.ठाणे

२/- जाहीरनामा आपले पो.ठाणे नोटीस बोर्ड, बीट चौकी, वृत्तपत्र व इतर ठिकाणी प्रसिध्द करुन मृतकाचे नातेवाईकांना अवगत करावे.

२. तलाठी सजा,
नवघर, घोडबंदर, काशिगांव.

२/- सदर जाहीरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्ड/दर्शनी भागावर प्रसिध्द करावा.

**प्रत सादर,**

१. मा.उपायुक्त,(मुख्यालय),मिरा-भाईंदर महानगरपालिका,भाईंदर प. (नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकरीता)
२. जिल्हा माहीती अधिकारी,ठाणे यांना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी.
३. कार्यालयीन अधीक्षक,मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांना पोलीस राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी.(ईऑफिस)
४. मिरा-भाईंदर महानगरपालीका पत्रकार कक्ष (प्रसिध्दीकरीता)
५. नस्तीकरीता.